तरुण भारत

शनिवार, ७ सप्टेंबर २०१९

# हळबे महाविद्यालयाची पूरग्रस्तांना आर्थिक मदत




दोडामार्ग : पूरग्रस्तांसाठी निधी संकलनाची मदतफेरी काढताना महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी. समीर ठाकुर

वार्ताहर
दोडामार्ग

येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाच्या एन.एस.एस. आजीवन अध्ययन व विस्तार व एन.सी.सी. विभागातील विद्यार्थ्यांनी पूरग्रस्तांसाठी दोडामार्ग शहरातून मदत निधी संकलन फेरी काढली. यावेळी दोडामार्ग शहरातील व्यापारी, दुकानदार, फेरीवाले यांनी मदत करून माणुसकीचे नाते जपले. या सर्वांचे आभार प्राचार्य डॉ. एस. यू. देरेकर यांनी मानले. या मदतफेरीमध्ये सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले होते.

**निधी संकलनासाठी मदत फेरी**